श्री. माधव बन्सी सानप, कनिष्ठ लिपिक (सेवा निवृत्त) यांचे सेवानिवृत्तीवेतन मंजूर होण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १० (४) मधील स्वेच्छा सेवानिवृत्तीची ५५ वर्षे वयाची अट शिथिल करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र. मुविनि-२०१७/प्र.क्र. १६५/ऊर्जा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दि. २० एप्रिल, २०१८.

वाचा :- १) श्री. माधव बन्सी सानप, कनिष्ठ लिपिक (सेवा निवृत्त) यांचा दि.३०/०१/२०१७ रोजीचा अर्ज
२) मुख्य विद्युत निरीक्षक, मुंबई यांचे पत्र क्र. मुविनि/का-२/आस्था-१/७८६/२०१७, दि. १७/०५/२०१७ व पत्र क्र. मुविनि/का-२/आस्था-१/१५८२/२०१७, दि. १६/१०/२०१७.

प्रस्तावना:-

विद्युत निरीक्षणालय अंतर्गत विद्युत निरीक्षक, जालना या कार्यालयातील श्री. माधव बन्सी सानप, कनिष्ठ लिपिक (सेवानिवृत्त) यांनी दिलेल्या स्वेच्छा निवृत्तीच्या नोटीशीस अनुसरून श्री. सानप हे दि. १०/०५/२०१६ रोजी शासन सेवेतून स्वेच्छा सेवानिवृत्त झाले आहेत. विद्युत निरीक्षक कार्यालय, जालना यांनी दि. ६/१०/२०१६ च्या पत्रान्वये श्री. सानप यांचे निवृत्तीवेतन प्रकरण महालेखापाल, (लेखा व हकदारी) -२, महाराष्ट्र, नागपूर यांचे कार्यालयास मंजुरीसाठी सादर केले होते. परंतु श्री. सानप, कनिष्ठ लिपिक यांची शासन सेवेत वयाची ५५ वर्षे पूर्ण झाली नसल्याने व त्यांनी वयाच्या ५४ वर्षे १ महिना १७ दिवस इतकाच त्यांचा सेवेचा कार्यकाळ झालेला असल्याने, महालेखापाल कार्यालयाने त्यांचे निवृत्तीवेतन प्रकरण मंजूर केले नाही. महालेखापाल कार्यालयाने त्यांच्या दि. ०६/०१/२०१७ रोजीच्या पत्रान्वये श्री. सानप यांच्या निवृत्ती वेतनाचा प्रस्ताव मंजूर होण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम १० (४) नुसार ५५ वर्षाची अट क्षमापित करण्यासाठी शासन मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्याबाबत विद्युत निरीक्षक यांना कळविले होते. त्यानुषंगाने श्री. सानप यांनी संदर्भ क्र. १ येथील अर्जान्वये स्वेच्छा सेवानिवृत्तीची अट शिथिल करण्याबाबत केलेल्या विनंतीस अनुसरून मुख्य विद्युत निरीक्षक यांनी त्यांच्या उपरोक्त संदर्भ क्र. २ अन्वये प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर केला होता.

श्री. माधव बन्सी सानप, कनिष्ठ लिपिक (सेवा निवृत्त) यांचे सेवानिवृत्तीवेतन मंजूर होण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १० (४) मधील स्वेच्छा सेवानिवृत्तीची ५५ वर्षे वयाची अट शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

श्री. माधव बन्सी सानप, कनिष्ठ लिपिक (सेवानिवृत्त) हे भारतीय सेवा दलातील माजी सैनिक असल्याची बाब विचारात घेऊन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम ४ मध्ये

देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून श्री. सानप यांना सेवानिवृत्तीवेतन मंजूर होण्यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १० (४) मधील स्वेच्छा सेवानिवृत्तीची ५५ वर्षे वयाची अट शिथिल करण्यास एक विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर आदेश वित्त विभागाच्या मान्यतेने व त्यांच्या अनौ. संदर्भ क्र. १९९/१७/सेवा-४, दि. १४/११/२०१७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०४२४१७३४४६६७१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षंकीत करून काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bhimashankar Yallappa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallappa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries,Energy And Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873ce9a279d9561ff0cbf658e05b823c67c79dcac309fc4ebdac035d6aeec2a0, cn=Bhimashankar Yallappa Manta
Date: 2018.04.24 17:39:04 +05'30'

(भि. य. मंता)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव
४) मा. मंत्री (ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई
७) प्रधान सचिव (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई
८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई ४०० ०२०
९) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) /(लेखा परीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर
१०) मुख्य विद्युत निरीक्षक,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, तिसरा मजला प्रशासकीय इमारत, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर (पू) मुंबई-७१
११) अधिक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ, औरंगाबाद
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, जालना
१३) श्री. माधव बन्सी सानप, कनिष्ठ लिपिक (सेवानिवृत्त), मु. पो. अंढेरा, ता. देऊळगांव राजा, जि. बुलढाणा.
१४) निवड नस्ती (ऊर्जा-५).